# गांधींचे ग्रामविकासाचे स्वप्न साकारण्यासाठी ‘माणुसकीला साद’

गांधी जयंतीला सर्वांना महात्मा गांधींविषयी प्रेमाचा उमाळा येतोच. गांधी विचाराशिवाय या देशाला तरणोपाय नाही, अशी वाक्ये कानावर पडतात. गांधींचा जयजयकार करीत हातात झाडू घेऊन रस्ते झाडणारे गल्लोगल्ली दिसतात. दरवर्षी २ ऑक्टोबरला दिसणाऱ्या या दृष्याची आता सर्वांनाच सवय झाली आहे. या देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या राष्ट्रभक्तांच्या फोटोला हार अर्पण करून त्यांच्या नावाचा उदो-उदो करण्यापलीकडे आमची देशभक्ती पुढे सरकतच नाही. गांधींच्या बाबतीतही हेच झाले. देशविकासापेक्षा स्वतःच्या विकासासाठीच गांधींचा वापर जास्त झाला. गांधी हत्येपेक्षाही गांधी विचारांच्या हत्येचे मोठे पाप या देशातील नेते दररोज करताहेत. अशाही अंधकारमय परिस्थितीत काही प्रकाशाची बेटे आहेत, जी गांधीजींचे विचार अमलात आणून या देशाला ‘सुजलाम सुफलाम’ करण्यासाठी धडपडताना दिसताहेत. फारसे प्रकाशझोतात नसलेले हरीश बुटले हे मला याच श्रेणीतील वाटले म्हणून हा लेखप्रपंच..!

साद ग्राम संकल्पना घेऊन विदर्भातील गावागावांमध्ये संपर्क करीत असताना हरीश बुटले यांची माझी भेट झाली. त्यांनी २० सप्टेंबरला आमच्या विदर्भ लोकवाणीच्या कार्यालयाला भेट दिली. साद ग्राम संकल्पना जेव्हा त्यांनी उलगडली, तेव्हा मी अक्षरशः भारावून गेलो. साद माणुसकीची फाउंडेशन, पुणे अंतर्गत हा उपक्रम सुरू आहे, असे जेव्हा कळले तेव्हा थोडी मनात खंत होती. पुण्याचेच लोक येऊन आम्हाला का अक्कल सांगतात, अक्कलेचा ठेका यांच्याकडेच आहे का, असे अनेक प्रश्न माझ्या मनात होते. ते क्षणार्धात दूर झाले जेव्हा हे कळले की बुटले मूळचे चंद्रपूरचे आहेत. विदर्भीय माणसाविषयी उर्वरित महाराष्ट्राच्या मनात जो मागासला माणूस म्हणून तिटकारा आहे, त्याला चपराक देणाऱ्या या प्रसंगाने माझा उर भरून आला.

हरीश बुटले मागील अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करत आहेत. शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले क्रांतिकारी काम लोकांना माहीत आहेच. श्रद्धा क्लासेस, सर फाउंडेशन, डीपर या संस्थांच्या माध्यमातून हा माणूस शैक्षणिक प्रगतीकरिता धडपडत आहे. हे सर्व करीत असताना महात्मा गांधींनी या देशाच्या सर्वांगीण विकासाकरिता दिलेला समग्र ग्रामविकासाचा विचार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. ‘खेड्यांचा देश’ म्हणून ओळख असलेल्या देशाचा विकास खेड्यांच्या विकासाशिवाय होऊ शकत नाही, हे गांधींनी सांगितले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून सरकारे गांधींचे विचार साकारताहेत. आमदार, खासदार दत्तक नाव घेतात. जाहिरातबाजी, फोटोसेशन, भूमिपूजन, फलक लावणे, यापुढे काहीच होत नाही. रस्ते, नाले, वीज, पाणी हा विकासाचा पहिला टप्पा आता जवळपास पूर्ण झाला आहे म्हणूनच हरीश बुटले यांनी शिक्षण, आरोग्य, शेती व पर्यावरण, कौशल्यविकास वृद्धसेवा ही पंचसूत्री घेऊन सादग्राम संकल्पनेला मूर्त रूप देण्यास सुरुवात केली आहे.

विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात हरीश बुटले यांनी प्रवास करून ७२ तालुक्यांमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांचे जाळे तयार केले. बुटले सरांच्या मार्गदर्शनाखाली बंडूभाऊ आंबटकर यांच्या नेतृत्वात ७२ तालुक्यांमध्ये गांधी जयंतीनिमित्त रॅली काढून साद ग्राम संकल्पनेचा प्रचार, प्रसार करण्यात आला. एकाच वेळी साद माणुसकीची फाउंडेशनच्या ७२ संपर्क कार्यालयांचे उद्‌घाटन करण्यात आले. विदर्भातील सर्व जिल्हाप्रमुखांनी यासाठी रात्रीचा दिवस केला. दिलीप बिसेन-भंडारा, संगीता गायकवाड-यवतमाळ, विजय चिमनकर - वाशिम, सुनीता राठोड - अकोला, वैशाली बहिणाबाई गणेश - अमरावती, आशिष वरकड - वर्धा, निशिकांत चौधरी - नागपूर, किशोर चौधरी - चंद्रपूर, गुरूदास सेमस्कर - गडचिरोली, महेश कांबळे - गोंदिया, संजय पाटील - बुलढाणा हे सर्व सैनिक साद ग्राम संकल्पनेचा झेंडा खांद्यावर घेऊन खेड्याकडे निघाले आहेत. प्रत्येक तालुक्यातील एक गाव दत्तक घेऊन त्या गावात शिक्षण, आरोग्य, शेती व पर्यावरण, कौशल्यविकास, वृद्धसेवा या पंचसूत्रीच्या माध्यमातून गावाचा विकास घडवून आणणे, हा या प्रकल्पाचा मुख्य हेतू आहे. यासाठी समाजातील अन्य घटकांचीही मदत घेतली जाणार आहे. वेळ, पैसा, श्रम, बुद्धी यापैकी ज्याच्याकडे जे असेल त्याचा वापर करून समग्र ग्रामविकासाचे स्वप्न साकारण्यासाठी बुटलेसरांचा मानस आहे. गांधींचे स्वप्न साकारण्यासाठी बुटलेसरांनी जे पाऊल उचलले आहे, त्यात त्यांना निर्विघ्न यश मिळो, हीच सदिच्छा..!

**नरेश बोपचे,**
संपादक, लोकवाणी, ९०४९४७५०१०

